29 OCT 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिवाळीत ध्वनी प्रदूषणाचा 'धमाका'

## सर्वच क्षेत्रात ओलांडली आवाजाची मर्यादा, शिवाजी विद्यापीठाचे निष्कर्ष

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

गतवर्षीच्या दिवाळीतील ध्वनी प्रदूषणाच्या पातळीपेक्षा यंदा अवाजाची पातळी अधिक असल्याचे समोर आले आहे. शहरातील शांतता क्षेत्र, रहिवासी क्षेत्र, व्यावसायिक क्षेत्र आणि औद्योगिक वसाहतीमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागातर्फे धनत्रयोदशी, लक्ष्मीपूजन आणि दिवाळी पाडवा या दिवशी ही पाहणी करण्यात आली, अशी माहिती डॉ. आसावरी जाधव यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाचे विद्यार्थी अभ्यासक्रमाचा भाग म्हणून दरवर्षी गणेशोत्सव, तसेच दिवाळीमध्ये शहरात होणाऱ्या ध्वनी प्रदूषणाच्या पातळीचा अभ्यास करतात. यानुसार केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचीनुसार ध्वनी प्रदूषणाचे मोजमाप केले.

मार्गदर्शक सूचीनुसार आवाजाची पातळी व्यावसायिक क्षेत्रात ६५ डेसिबल, शांतता क्षेत्रात ५० डेसिबल, रहिवासी क्षेत्रात ५५ डेसिबल, औद्योगिक वसाहतीमध्ये ७५ डेसिबल असावी लागते. पर्यावरणशास्त्र विभागाचे डॉ. पी. डी. राऊत, संशोधक विद्यार्थी चेतन भोसले, हर्षद मालवकर यांनी हा अभ्यास केला.

| शांतता क्षेत्र (५० डेसिबल) | धनत्रयोदशी | लक्ष्मीपूजन | पाडवा |
|---|---|---|---|
| सीपीआर : | ७०.७० | ७४.८० | ६९.३० |
| जिल्हा न्यायालय : | ७२.२० | ७१.७० | ७३.०० |
| शिवाजी विद्यापीठ : | ६६.१० | ७५.१० | ५०.१० |
| **रहिवासी क्षेत्र (५५ डेसिबल)** | | | |
| शिवाजी पेठ : | ७५.३० | ७५.३० | ७८.४० |
| राजारामपुरी : | ६७.३० | ७६.४० | ८९.१० |
| ताराबाई पार्क : | ७३.४० | ७३.३० | ७०.५० |
| **व्यावसायिक (६५ डेसिबल)** | | | |
| लक्ष्मीपुरी : | ७३.५० | ७७.७० | ७९.३० |
| गुजरी : | ७८.६० | ७६.९० | ९५.४० |
| महाद्वार रोड : | ६७.७० | ८१.३० | ७९.९० |
| **औद्योगिक वसाहत (७५ डेसिबल)** | | | |
| वाय. पी. पोवारनगर : | ६९.३० | ८२.३० | ८१.०० |
| शिवाजी उद्यमनगर : | ६७.६० | ८९.०० | ७६.५० |



### गुजरीत सर्वाधिक गोंगाट

धनत्रयोदशी, लक्ष्मीपूजन आणि दिवाळी पाडवा या तीनही दिवशी आवाजाची पातळी मर्यादेपेक्षा अधिक होती. मार्गदर्शक सूचीनुसार व्यावसायिक क्षेत्रामध्ये आवांजाची मर्यादा ६५ डेसिबलपेक्षा कमी असणे अपेक्षित आहे; मात्र दिवाळी पाडव्यादिवशी गुजरी परिसरातील आवाज ९५.४० डेसिबल इतका होता.

29 OCT 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ध्वनी प्रदूषणात गतवर्षीपेक्षा वाढ


## विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागातर्फे तीन दिवस निरीक्षण



कोल्हापूर, ता. २८ : यंदाच्या दिवाळीत आतषबाजीमुळे ध्वनी प्रदूषणात गतवर्षीपेक्षा अधिक वाढ झाल्याचे दिसून आले. शहरातील सर्वच ठिकाणी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानांकनापेक्षा ध्वनीची पातळी अधिक राहिली. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागातर्फे २२, २४ व २६ ऑक्टोबर रोजी ध्वनीच्या पातळीचे निरीक्षण करण्यात आले. केंद्रीय मंडळाच्या मानांकनानुसार औद्योगिक क्षेत्रात ध्वनीची पातळी ७५, व्यापारी ६५, रहिवासी ५५, तर शांतता परिसरात ५० डेसिबल निश्चित केली आहे. पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. आसावरी जाधव, डॉ. पी. डी. राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली चेतन भोसले, हर्षद माळवेकर यांनी याबाबतचा अहवाल केला.

**ध्वनी पातळी अशी (डेसिबलमध्ये)**

| क्षेत्र | ठिकाण | धनत्रयोदशी | लक्ष्मीपूजन | पाडवा |
|---|---|---|---|---|
| शांतता | सीपीआर | ७०.७० | ७४.८० | ६९.३० |
| | जिल्हाधिकारी कार्यालय | ७२.२० | ७१.६० | ६८.४० |
| | जिल्हा न्यायालय | ७२.२० | ७१.७० | ७३.०० |
| | शिवाजी विद्यापीठ | ६६.१० | ७५.१० | ५०.१० |
| रहिवासी | शिवाजी पेठ | ७५.३० | ७५.३० | ७८.४० |
| | मंगळवार पेठ | ७२.८० | ७४.०० | ६९.३० |
| | उत्तरेश्वर पेठ | ७४.३० | ६७.८० | ७८.९० |
| | राजारामपुरी पाचवी गल्ली | ६७.३० | ७६.४० | ८९.१० |
| | नागाळा पार्क | ६६.६० | ८२.९० | ७०.५० |
| | ताराबाई पार्क | ७३.४० | ७३.३० | ७०.५० |
| व्यापारी | लक्ष्मीपुरी | ७३.५० | ७७.७० | ७९.३० |
| | बिंदू चौक | ८०.५० | ७८.६० | ७७.४० |
| | गुजरी | ७८.६० | ७६.९० | ९५.४० |
| | महाद्वार रोड | ६७.७० | ८१.३० | ७९.९० |
| | मिरजकर तिकटी | ७९.२० | ८०.०० | ७५.९० |
| | बिनखांबी गणेश मंदिर | ७७.९० | ७७.६० | ७७.२० |
| | गंगावेस | ७६.१० | ७५.०० | ७३.८० |
| | पापाची तिकटी | ७६.७० | ६९.८० | ७६.३० |
| | शाहूपुरी | ७७.९० | ६६.५० | ७७.२० |
| | राजारामपुरी सहावी गल्ली | ७१.६० | ६७.२० | ८२.०० |
| औद्योगिक | वाय. पी. पोवार नगर | ६९.३० | ८२.३० | ८१.०० |
| | उद्यमनगर | ६७.६० | ८९.०० | ७६.५० |



29 OCT 2022

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# दिवाळीत कानठळ्या बसवणारा 'आवाज'

## ध्वनी प्रदूषणाने ओलांडली पातळी : शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाकडून पाहणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** यंदा कोल्हापूरकरांनी निर्बंधमुक्त दिवाळी साजरी केली. धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी व लक्ष्मीपूजन आणि पाडवा-भाऊबीज दिवशी नागरिक, व्यापारी, व्यावसायिकांनी फटाके उडविले. त्यामुळे आवाजाची पातळी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानांकनापेक्षा अधिक असल्याचे शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या पाहणीत आढळले.

शहरातील २२ ठिकाणी पर्यावरणशास्त्र विभागाने दि. २२, २४ आणि २६ ऑक्टोबर रोजी पाहणी केली. सायंकाळी सहा ते रात्री दहा या



वेळेत ध्वनी प्रदूषणाच्या नोंदी घेतल्या. त्यात गेल्यावर्षीच्या तुलनेत यावर्षी ध्वनी प्रदूषणात वाढ झाल्याचे आढळून आले.

सर्वच ठिकाणी आवाजाची पातळी मंडळाच्या मानांकनापेक्षा जास्त असल्याचे विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी सांगितले. विद्यार्थी चेतन भोसले, एमएस्सीचे विद्यार्थी हर्षद मालवेकर याने ध्वनी प्रदूषणाच्या नोंदी घेतल्या. त्यांना डॉ. पी. डी. राऊत, डॉ. जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

### शहरातील यावर्षीचा फटाक्यांचा आवाज (डेसिबलमध्ये)

| परिसर | धनत्रयोदशी | लक्ष्मीपूजन | पाडवा |
|---|---|---|---|
| सीपीआर | ७०.७० | ७४.८० | ६९.३० |
| जिल्हाधिकारी कार्यालय | ७२.२० | ७१.६० | ६८.४० |
| लाईन बाजार ते कसबा बावडामार्ग | ७२.२० | ७१.७० | ७३.०० |
| शिवाजी विद्यापीठ | ६६.१० | ७५.१० | ५०.१० |
| शिवाजी पेठ | ७५.३० | ७५.३० | ७८.४० |
| मंगळवार पेठ | ७२.८० | ७४.०० | ६९.३० |
| उत्तरेश्वर पेठ | ७४.३० | ६७.८० | ७८.९० |
| राजारामपुरी ५ गल्ली | ६७.३० | ७६.४० | ८९.१० |
| नागाळा पार्क | ६६.६० | ८२.९० | ७०.५० |
| ताराबाई पार्क | ७३.४० | ७३.३० | ७०.५० |
| लक्ष्मीपुरी | ७३.५० | ७७.७० | ७९.३० |
| बिंदू चौक | ८०.५० | ७८.६० | ७७.४० |
| गुजरी | ७८.६० | ७६.९० | ९५.४० |
| महाद्वार रोड | ६७.७० | ८१.३० | ७९.९० |
| मिरजकर तिकटी | ७९.२० | ८०.०० | ७५.९० |
| बिनखांबी गणेश मंदिर | ७७.९० | ७७.६० | ७७.२० |
| गंगावेश | ७६.१० | ७५.०० | ७३.८० |
| पापाची तिकटी | ७६.७० | ६९.८० | ७६.३० |
| शाहूपुरी | ७७.९० | ६६.५० | ७७.२० |
| राजारामपुरी ६ गल्ली | ७१.६० | ६७.२० | ८२.३० |
| वाय. पी. पोवारनगर | ६९.३० | ८२.३० | ८१.०० |
| शिवाजी उद्यमनगर | ६७.६० | ८९.०० | ७६.५० |

| मर्यादा अशा (डेसिबलमध्ये) | औद्योगिक | व्यावसायिक | रहिवासी | शांतता |
|---|---|---|---|---|
| | ७५ | ६५ | ५५ | ५० |

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 OCT 2022
पुढारी

# विद्यापीठ निवडणुकीसाठी रात्री उशिरापर्यंत अर्ज वर्गीकरण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. विद्यापीठ अधिसभा, विद्या परिषद व अभ्यास मंडळे या अधिकार मंडळांवर सदस्य निवडणुकीसाठी प्राप्त अर्जांचे शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत वर्गीकरण सुरू होते. मतदान १४ नोव्हेंबर रोजी होईल. त्यानंतर १६ नोव्हेंबर रोजी विद्यापीठ कार्यालयात मतमोजणी होईल, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

लोकमत

# 'सिनेट'साठी अखेर दिवशी बहुतांश जणांचे अर्ज दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट) आणि विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत शुक्रवारी संपली. अखेरच्या दिवशी विविध संघटनांनी अर्ज दाखल केले. या अर्जांच्या वर्गीकरणाचे काम रात्री उशिरापर्यंत विद्यापीठाच्या सभा आणि निवडणूक विभागाकडून सुरू होते.

विद्यापीठ विकास आघाडी, सुटा, शिव-शाहू आघाडी, आजी-माजी विद्यार्थी कृती समिती, आदींची जागा वाटप, उमेदवार निश्चितीची प्रक्रिया थोडी लांबली. पदवीधर, विद्या परिषद, संस्थाचालक, शिक्षक अशा गटनिहाय अर्जांच्या वर्गीकरणाचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते. दरम्यान, निवडणुकांसाठी प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी प्रक्रिया दि.३१ ऑक्टोबरला होईल. दि.१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल, असे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सांगितले.

सकाळ

# विद्यापीठ निवडणुकीसाठी विविध संघटनांचे अर्ज



कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी विविध संघटनांच्या इच्छुक उमेदवारांनी अर्ज भरले. अर्ज दाखल करण्याचा आजअखेरचा दिवस होता. अर्जांची छानननी ३१ ऑक्टोबरपर्यंत होणार असून, १ नोव्हेंबरला सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवार अर्ज माघारी घेऊ शकतात.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायद्यानुसार अधिसभा, विद्या परिषद व अभ्यास मंडळांसाठी निवडणूक होत आहे. त्यासाठी शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी, शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा), शिव-शाहू आघाडीने कंबर कसली आहे. अधिसभा ३९, विद्या परिषदेच्या ८ आणि प्रत्येक अभ्यास मंडळावर ३ सदस्य याप्रमाणे निवड होणार असल्याने त्याकरिता इच्छुकांचे अर्ज दाखल करण्यात आले आहेत. अधिसभेवर प्राचार्य गटातून १०, शिक्षक गटातून १०, संस्था संचालकांमधून ६, विद्यापीठ अधिविभागातील शिक्षकांमधून ३ आणि नोंदणीकृत पदवीधरांमधून १० सदस्य निवडले जाणार असल्याने संघटनांनी इच्छुकांची सखोल चर्चेअंती अर्ज दाखल केले आहेत. संघटनांचे सदस्यही विद्यापीठात आले होते. दरम्यान, निवडणुकीसाठी संस्थाचालक ११६, महाविद्यालयीन शिक्षक २९४५, विद्यापीठ शिक्षक १६६, नोंदणीकृत पदवीधर ३६३४३, प्राचार्य ९३ व विभागप्रमुख ९३७ मतदार मतदान करतील.

- मतदान - १४ नोव्हेंबर
- मतमोजणी - १६ नोव्हेंबर